सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०७ नोव्हेंबर २०१७.

**बृहन्मुंबईतील प्रभाग क्रमांक २१ व ६२ च्या पोटनिवडणुकीसाठी १३ डिसेंबरला मतदान**

मुंबई, दि.०७: बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २१ आणि ६२ च्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीसाठी १३ डिसेंबर २०१७ रोजी मतदान होणार आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे केली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, या पोटनिवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे २० ते २७ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत स्वीकारण्यात येतील. त्यांची छाननी २८ नोव्हेंबर २०१७ रोजी होईल. ३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. निवडणूक चिन्हांचे वाटप २ डिसेंबर २०१७ रोजी होईल. मतदान १३ डिसेंबर २०१७ रोजी होईल. मतमोजणी १४ डिसेंबर २०१७ रोजी होईल.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)